**आकाशवाणी पुणे**

**प्रादेशिक वृत्त विभाग**

**पुणे वृत्तांत**

**वेळ - संध्याकाळी 06.00 वा.**

**दिनांक- 10.08.2025** **वार- रविवार**

---

**<u>वंदेभारत</u>**

पंतप्रधान नरेंद्र मोदी यांनी आज नागपूर अजनी ते पुणे दरम्यानच्या वंदे भारत रेल्वेचं दूरस्थ पद्धतीनं लोकार्पण केलं. बंगळुरूच्या केएसआर रेल्वे स्थानकावरून पंतप्रधानांच्या हस्ते अजनी ते पुणे, बंगळुरू ते बेळगाव आणि अमृतसर ते कटरा माता वैष्णोदेवी या तीन नव्या वंदे भारत रेल्वेगाड्यांना हिरवा झेंडा दाखवण्यात आला. केंद्रीय मंत्री नितीन गडकरी आणि मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस नागपूर रेल्वे स्थानकावरून या समारंभात सहभागी झाले.

देशात नागपूर-पुणे ही सर्वाधिक अंतराची वंदे भारत रेल्वे सुरू झाली असून त्यामुळे वेळेची मोठी बचत होऊन विदर्भातल्या लोकांना पुण्याशी जोडलं जाईल असं मुख्यमंत्री यावेळी म्हणाले. सध्या अहिल्यानगरहून रेल्वे दौन्डला जाऊन नंतर पुण्याला जाते, पण नगर ते पुणे असा रेल्वेमार्ग तयार झाला तर वेळेची बचत होईल तसंच अंतर देखील कमी होईल, यासाठी मध्य रेल्वेच्या प्रमुखांशी सकारात्मक चर्चा झाल्याचं मुख्यमंत्र्यांनी सांगितलं.

**<u>पीएमपी</u>**

पीएमपीएमएलच्या मालकीच्या बस बंद पडल्या तर देखभाल दुरुस्ती अभियंता आणि चालक यांची अर्ध्या दिवसाची वेतन कपात केली जाणार आहे. पीएमपीचे अध्यक्ष आणि व्यवस्थापकीय संचालक पंकज देवरे यांनी याबाबत आदेश दिला आहे. हा निर्णय ‘पीएमपी’च्या मालकीच्याच बससाठी घेण्यात आला असून, ठेकेदारांच्या बसबाबत उल्लेख नसल्याने कामगार संघटनेने या निर्णयाला विरोध केला आहे.

**pcmc**

पिंपरी चिंचवड महापालिकेच्या अनेक शाळांमध्ये डिजिटल शिक्षण पद्धतीला सुरुवात होत आहे. याचा प्रारंभ कुदळवाडी क्रमांक 89 या शाळेपासून झाला आहे. या शाळेमध्ये ‘प्रिझम सॉफ्टवेअर डिस्प्ले बोर्ड’ या उपक्रमाचं उद्घाटन सहाय्यक आयुक्त किरणकुमार मोरे यांच्या हस्ते काल झालं. या सॉफ्टवेअरच्या माध्यमातून विद्यार्थ्यांची दैनंदिन हजेरी, दाखले, गुणपत्रिका, प्रवेश अर्ज, शाळेतील उपक्रमांची नोंद, ग्रंथालयातील पुस्तकं यांची नोंद ठेवली जात आहे. आता महापालिकेच्या इतर शाळांमध्येही अशा स्वरूपाचं सॉफ्टवेअर उपयोगात आणलं जाणार आहे.

**रक्षाबंधन**

श्रावणी पौर्णिमेचा दिवस देशभर संस्कृत दिन म्हणून साजरा केला जातो. पुण्यात येत्या १३ ऑगस्टला हा दिवस साजरा केला जाणार आहे. संस्कृतचा प्रसार आणि प्रशिक्षण क्षेत्रात काम करणाऱ्या पुण्यातल्या ५०पेक्षा जास्त संस्थांनी याचं आयोजन केलं आहे, असं डेक्कन विद्यापीठाचे कुलगुरू

डॉ. प्रसाद जोशी यांनी सांगितलं. फर्ग्युसन महाविद्यालयाच्या अम्फी थिएटरमध्ये संध्याकाळी ४ वाजता होणाऱ्या या कार्यक्रमाला पुण्यातील संस्कृत प्रेमींनी मोठ्या संख्येने उपस्थित राहावं असं आवाहन डॉ. जोशी यांनी केलं आहे.

**<u>पुरुषोत्तम</u>**

महाविद्यालयीन विद्यार्थ्यांच्या आकर्षणाचा केंद्रबिंदू असलेल्या हीरक महोत्सवी पुरुषोत्तम करंडक एकांकिका स्पर्धेला पुण्यात आजपासून जल्लोषात सुरुवात झाली. महाराष्ट्रीय कलोपासक आयोजित या स्पर्धा भरत नाट्य मंदिर इथं येत्या 24 ऑगस्टपर्यंत रंगणार आहेत.

महाराष्ट्रीय कलोपासकचं 90वं वर्ष आणि पुरुषोत्तम करंडक एकांकिका स्पर्धेच्या हीरक महोत्सवानिमित्त भरत नाट्य मंदिराच्या आवारात संस्था आणि स्पर्धेचा ‘मागे वळून पाहताना’ हा चित्रमय इतिहास मांडण्यात आला आहे.

**<u>बंधुता साहित्य</u>**

बंधुतेचा विचारच समाजाला एकसंध ठेवू शकतो; त्यामुळे हा विचार मनामनात रुजवण्याची आवश्यकता आहे," असं प्रतिपादन मुस्लिम सत्यशोधक मंडळाचे अध्यक्ष, विचारवंत डॉ. शमशुद्दीन तांबोळी यांनी आज पुण्यात केलं. बाराव्या विश्वबंधुता विद्यार्थी शिक्षक साहित्य संमेलनाच्या समारोप सत्रात ते बोलत होते. यावेळी डॉ. शमशुद्दीन तांबोळी आणि

आयुर्वेदतज्ञ डॉ. जयकुमार ताम्हाणे यांना 'डॉ. बाबासाहेब आंबेडकर प्रज्ञावंत पुरस्कार' प्रदान करण्यात आला.

## परिवहन कार्यालय

पुणे विभागीय प्रादेशिक परिवहन कार्यालयाने बेकायदा वर्तन करणाऱ्या रिक्षाचालकांविरोधात मोहीम सुरू केली आहे. अवघ्या तीन महिन्यांत २५२ तक्रारी आल्यानंतर ही कारवाई हाती घेण्यात आली. रिक्षा चालकांनी भाडं नाकारलं, उद्धटपणे वागले, जास्तीचं भाडं आकारलं, गैरवर्तन केलं तर नागरिकांना ८ २ ७ ५ ३ ३ ० १ ० १ या क्रमांकावर कॉल करून, फोटोसह तक्रार नोंदवता येईल असं पुणे उपप्रादेशिक परिवहन अधिकारी स्वप्निल भोसले यांनी कळवलं आहे.

## बाजारसमिती

पुणे कृषी उत्पन्न बाजार समितीच्या आवारात आज महाराष्ट्रासह विविध  राज्यातून नव्वद ट्रक फळभाज्यांची आवक झाली. मागणी वाढल्याने फ्लॉवर, मटार, गाजर यांच्या भावात वाढ झाली तर भुईमूग शेंगाचे भाव खाली आले आहेत. पालेभाज्यांना मागणी चांगली असून कोथिंबीर, पालक आणि करडईचे भाव काहीसे वधारले आहे. उद्याच्या श्रावणी सोमवारमुळे फुल बाजारात तसंच फळ बाजारातही मागणी चांगली आहे.

## हवामान

पुणे आणि परिसरात आज कमाल तापमान २९ पूर्णांक २ आणि किमान तापमान २२ पूर्णांक ३ दशांश अंश सेल्सियस नोंदवलं गेलं. उद्याही तापमान साधारण असंच असेल, तसंच हलक्या पावसाचाही अंदाज पुणे वेधशाळेनं वर्तवला आहे.

**हा होता आजचा पुणे वृत्तांत. उद्या पुन्हा भेटू विविध भारती पुणे केंद्रावर, संध्याकाळी सहा वाजता, ताज्या पुणे वृत्तांतमध्ये, नमस्कार.**